# मुंबई पत्तन न्यास कर्मचारी (घरभाडे भत्ता) नियम, १९७५

------

## मुंबई पत्तन न्यास कर्मचारी (घरभाडे भत्ता) नियम, १९७५

------

## अनुक्रमणिका

----


| नियम क्रं. | तपशील | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त शीर्षक व सुरुवात | |
| २ | नियम लागू होणे | |
| ३ | व्याख्या | |
| ४ | भत्याचे दर | |
| ५ | भत्ता देय नसलेल्या बाबी | |
| ६ | आंबटीत केलेले घर इतर कर्मचा-यांबरोबर सहभागीत केल्यास (शेअर केल्यास) देय असलेला भत्ता | |
| ७ | घर संयुक्तरीत्या आंबटीत केल्यास नियम | |
| ८ | कमी दर्जाच्या घराबाबत बाजार भाडे देऊन घरभाडे भत्ता देण्याचा पर्याय | |
| ९ | स्वत:च्या मालकीचे घर असलेले कर्मचारी | |
| १० | वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये भत्याचे नियम | |
| ११ | बिनभाड्याच्या घराऐवजी घरभाडे भत्ता | |
| १२ | प्रथम श्रेणी व द्वितीय श्रेणी कर्मचा-याना दरमहा रु.१६० च्या मर्यादेच्या अधीन राहून वेतनाच्या १६% पेक्षा जास्त घरभाडे भत्याच्या दावा करण्यासाठीची पध्दती | |
| १३ | बिनभाड्याचे घर मिळण्याची असलेला तृतीय श्रेणी किंवा चतुर्थ श्रेणी कर्मचा-याने वेतनाच्या १६% पेक्षा जास्त घरभाडे भत्त्याच्या दावा करण्याची पध्दती | |
| १४ | प्रमाणपत्रे | |
| १५ | स्पष्टीकरण | |
| १६ | खंडन व व्यावृत्ती | |

सूची १ - ए
१ - बी
सूची २
सूची ३

## मुंबई पत्तन न्यास कर्मचारी (घरभाडे भत्ता) नियम, १९७५

मेजर पोर्टस अॅक्ट १९६३ (३८/१९६३) च्या कलम २८ नुसार मुंबई पत्तन न्यासाच्या विश्वस्त मंडळाने उपरोक्त कायद्याच्या कलम १२४ (१) नुसार केंद्र सरकारची परवानगी घेऊन खालील नियम करीत आहे. हे नियम कलम १२४ (२) नुसार लागोपाठच्या दोन अधिकृत पत्रिकेमध्ये प्रसिध्द झाले आहेत.

१) **संक्षिप्त शीर्षक व सुरुवात**

(१) या नियमांना मुंबई पत्तन न्यास कर्मचारी (घरभाडे भत्ता) नियम १९७५ असे संबोधले जाईल.

(२) हे नियम ज्या दिवसी अधिकृत पत्रिकेत प्रसिध्द होतील त्या दिवसापासुन लागू होतील.

२) **नियम लागू होणे**

या नियमांत व्यावृत्तीचे प्रावधान नसेल तर हे नियम मंडळाच्या सर्व कर्मचा-याना लागू होतील. मात्र खालील व्यक्तीना लागू होणार नाहीत.

(अ) प्रासंगिक किंवा अर्धवेळ तत्वावर नेमलेल्या व्यक्ती,

(ब) अकस्मात निधीतून ज्या व्यक्तीना वेतन दिले जाते,

(क) केंद्र / राज्य शासन किंवा स्थानिक वा अन्य प्राधिकरणातून प्रतिनियुक्ती तत्वावर मर्यादित काळासाठी नेमणूक झालेल्या व्यक्ती,

(ड) तदर्थ तत्वावर किंवा वैयक्तीक वेतन तत्वावर नेमलेल्या व्यक्ती मात्र त्यांच्या नेमणूक पत्रामध्ये त्याना वेतनाव्यतिरिक्त घरभाडे भत्ता देय असल्याचा उल्लेख नसला तरच त्यांना हे नियम लागू होणार नाहीत.

(इ) शिकाऊ व्यक्ती.

(३) **व्याख्या**

या नियमांमध्ये संदर्भाला अन्य अर्थ आवश्यक नसल्यास :

(अ) मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व विभागप्रमुख या संज्ञांना मेजर पोर्टस ट्रस्ट ॲक्ट १९६३ (३८/१९६३) यामध्ये जो अर्थ दिला आहे, तोच अर्थ येथे लागू होतो.

(ब) "कर्मचारी" म्हणजे मंडळाचे कर्मचारी.

(क) मुंबई पत्तन न्यासाचे पगार, भत्ते, रजा, पेन्शन नियम यांचे पुस्तक नववी आवृत्ती यामध्ये कलम ११(११) यामध्ये दिलेली "वेतन" या सज्ञेची जी व्याख्या आहे, तीच व्याख्या या नियमांखाली लागू होते. त्यामध्ये जेथे अनुज्ञेय असेल तेथे महागाई वेतन सुध्दा सामील आहे.

(ड) (१) श्रेणी - १ चे पद म्हणजे दरमहा जास्तीत जास्त रूपये ११००/- वेतन असलेले पद किंवा ज्या श्रेणीत जास्तीत जास्त वेतन रु.११००/- आहे अशा वेतन श्रेणीतील पद.

(२) श्रेणी - २ चे पद म्हणजे जास्तीत जास्त वेतन ६५०/- रुपये पेक्षा जास्त पण रु.११००/- पेक्षा कमी असलेल्या वेतनाचे पद किंवा ज्या श्रेणीत जास्तीत जास्त वेतन रु.६५०/- पेक्षा जास्त आहे पण रु.११००/- पेक्षा कमी आहे अशा श्रेणीतले पद.

(३) श्रेणी - ३ चे पद म्हणजे जास्तीत जास्त वेतन रु.१६०/- पेक्षा जास्त पण रु.६५०/- पेक्षा कमी वेतन असलेले पद किंवा ज्या श्रेणीत जास्तीत जास्त वेतन रु.१६०/- पेक्षा जास्त पण रु.६५०/- पेक्षा कमी आहे अशा श्रेणीतील पद.

(४) श्रेणी - ४ चे पद म्हणजे जास्तीत जास्त वेतन १६०/- रुपये आहे असे पद किंवा ज्या श्रेणीत जास्तीत जास्त वेतन रु.१६०/- आहे अशा श्रेणीतील पद.

(ई) "कुटुंब" म्हणजे कर्मचाऱ्याची पत्नी / पती, मुले व त्या कर्मचा-याबरोबर राहणा-या व त्याच्यावर अवलंबून राहणा-या व्यक्ती. जर पती, पत्नी, मुले किंवा आई-वडील यांना उत्पन्नाचा वेगळा स्त्रोत उपलब्ध असला तर त्यांना "कुटुंब" या व्याख्येत धरले जाणार नाही. मात्र अपवाद म्हणजे अशा उत्पन्नाच्या स्त्रोतापासून पेन्शन सकट (पेन्शन मधील तात्पुरती वाढ व मृत्यु-निवृत्ती लाभ धरुन) उत्पन्न दरमहा रुपये २५०/- पेक्षा नसावे.

(एफ) "भाडे" म्हणजे जर कर्मचारी भाडेकरु असला तर त्याने तो राहत असलेल्या फर्निचर विरहित जागेवर राहण्यासाठी दिलेला मोबदला. त्यामध्ये नगरपालिकेचे व इतर कर (मात्र वेगळा लावलेला सेवाकर वगळून) जे कायद्यानुसार राहणाऱ्या व्यक्तीने द्यायचे असतील.

जर :-

(अ) एकत्रित कर स्थानिक अधिकाऱ्यांनी लावला असेल व सेवाकर वेगळा लावला नसेल व तसे म्हटले नसेल तर पूर्ण कर भाड्याचा भाग असेल.

(ब) जर घरात रेफ्रीजरेटर दिला असेल (घर अन्यथा फर्निचर विरहित असेल तर) घरासाठी दिलेल्या मोबदल्याची रक्कम उणे रुपये १५/- हे भाडे धरले जाईल.

(क) जर घरात फर्निचर दिले असेल तर घरासाठी दिलेल्या मोबदल्याची रक्कम उणे त्या कर्मचाऱ्याच्या वेतनाच्या रुपये २.१५% इतकी रक्कम ही घरभाडे धरले जाईल.

स्पष्टीकरण: जर घरात फर्निचर दिले नसेल व घरात विजेचे छतावरील पंखे (सीलिंग फॅन) पुरवले असतील तर त्या घरात फर्निचर दिले गेले आहे असे समजले जाणार नाही.

(ड) जर फर्निचर दिलेल्या घरात रेफ्रीजरेटर सुध्दा दिला असेल, तर उपकलम (क) खाली ठरविलेली रक्कम रुपये १५/- ने कमी करण्यात येईल.

(इ) जर कर्मचाऱ्याने त्याच्या कुटुंबाव्यतिरिक्त इतर प्रौढ व्यक्तीला घराचा भाग भाड्याने दिला किंवा सहभागीत (शेअर) केला (मग कर्मचारी असोत वा नसोत) तर त्याने घरासाठी दिलेला मालकाला दिलेला घराच्या मोबदल्यातील ४०% रक्कम किंवा त्याला पोट भाडेकरु किंवा सहभागीत व्यक्तीकडून मिळालेली रक्कम यातील जास्त असेल ती रक्कम वजा करुन उरलेली रक्कम भाडे समजण्यात येईल.

टीप (१)- घरात नोकर ठेवणे हे पोटभाडेकरु ठेवणे किंवा सहभागीकरण समजले जाणार नाही.

टीप (२)- जेव्हा कर्मचारी आपले घर पती/पत्नी/मुलगा/मुलगी यांच्याबरोबर शेअर करीत असेल

व अशी व्यक्ती केंद्र व राज्य सरकारच्या/स्वतंत्र किंवा अर्ध शासकीय संस्था जसे नगरपालिका सेवक असतील व त्या व्यक्तीला घरभाडे भत्ता मिळत नसेल तर अशा कर्मचाऱ्याला त्याने घरासाठी मालकाला दिलेल्या मोबदल्यात ४०% रक्कम वजा न करता पूर्ण रक्कम भाडे म्हणून समजण्याच्या पर्याय निवडण्याचे स्वातंत्र्य आहे.

(ii) जर कर्मचारी मालक असेल तर नगरपालिकेच्या कारणासाठी घराच्या ढोबळ भाडयाचा हिशोब करण्यासाठी दुरुस्तीसाठी १०% सूट कमी केली जाणार नाही. पण नगरपालिकेचे कर व इतर कर (सेवाकर वगळून) जे घरात राहण्याने देणे कायदेशीर दृष्ट्या आवश्यक आहेत, ते त्यात मिळवले जातील.

(iii) जर कर्मचारी वसतीगृहात किंवा खाणावळीत किंवा खाजगी व्यक्ती बरोबर पैसे देणारा पाहुणा (पेईंग गेस्ट) या तत्वावर राहत असेल तर तो राहण्याचे व जेवणाचे जे पैसे देतो त्याच्या ४०% किंवा जर तो फक्त राहत असेल (अशा व्यक्ती बरोबर खाणावळीत/वस्तीगृहात जेवत नसेल) तर रहाण्याच्या पैशाचे ८०% रक्कम.

(जी) येथे वापरलेले शब्द व संज्ञांची व्याख्या जर केली नसेल, पण जर त्या शब्दांची व संज्ञांची व्याख्या. मुंबई पत्तन न्यास पगार , भत्ते, रजा व पेन्शन नियम यांची पुस्तीका ९वी आवृत्ती किंवा मुंबई पत्तन न्यास कर्मचारी (रजा) नियम १९७५ मध्ये दिली असेल तर त्या व्याख्या या नियमासाठी लागू होतील.

४. **भत्त्याचे दर :**

(१) कर्मचाऱ्यांना देय असलेल्या भत्त्यांचे दर खालील प्रमाणे असतील.

| | | |
|---|---|---|
| (i) | प्रथम व द्वितीय श्रेणीचे कर्मचारी | पगाराच्या १६% जास्तीतजास्त रुपये १६०/- मात्र जर कर्मचाऱ्याने प्रत्यक्षात दिलेले भाडे त्याच्या पगाराच्या २६ पेक्षा जास्त असेल, त्याचा पगार रुपये १०००/- किंवा त्यापेक्षा कमी असेल किंवा त्याचा पगाराच्या १०% अधिक रुपये १६०/- या रकमेच्या पेक्षा जास्त असेल, जर त्याला |

| | | |
|---|---|---|
| | | रुपये १०००/- पेक्षा जास्त मिळत असेल तर त्याला मंजूर असलेला भत्ता हा त्याने दिलेले भाडे हे त्याच्या पगाराच्या १०% रकमेपेक्षा जितके जास्त असेल. या मंजूर असलेल्या भत्त्याच्या रकमेची मर्यादा त्याच्या पगाराच्या २०% किंवा रुपये ३००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती असेल. मात्र त्यासाठी त्याने भाडयाने घेतलेल्या घराचा दर्जा त्याच्या दर्जानुसार व पगारानुसार असला पाहिजे व त्यासाठी त्याने अध्यक्ष व उपाध्यक्षांची मान्यता घेतली असली पाहिजे व त्याने दिलेल्या भाडयाच्या पावत्या पडताळणीसाठी त्याने सहा महिन्यातून एकदा सादर केल्या पाहिजेत. |
| (ii) | श्रेणी ३ व श्रेणी ४ मधील कर्मचारी. | पगाराच्या १६% कमीतकमी दर माह रुपये २०/- |

(२) या नियमामध्ये वेगळे काही प्रावधान केले नसल्यास कर्मचाऱ्याला घरभाडे भत्त्यापोटी त्याच्या पगाराच्या १६% रक्कम देय होईल. ही रक्कम कमीतकमीत रु. २०/- दर महा असेल तर सदर कर्मचारी तृतीय व चौथ्या श्रेणीचा असेल तर त्याला घरभाडयापोटी त्याच्या पगाराच्या १६% रक्कम मिळेल ही रक्कम जास्तीत रु.१६०/- असेल. जर सदर कर्मचारी प्रथम किंवा द्वितीय श्रेणीचा असेल तर त्याला भाडेभत्त्याची पावती सादर करण्याची व त्याची पडताळणी करण्याची आवश्यकता नसेल व त्याने भरलेल्या भाड्याचा काही संबंध असणार नाही. मात्र जर अधिकाऱ्यांनी मुंबई पत्तन न्यास (घर आंबटित करणे व त्यात राहणे नियमित १९७५ च्या नियम १० उपनियम (१) नुसार जर तारीख चौदा दिवसापेक्षा जास्त वाढविली तर त्या वाढलेल्या दिवसापासून किंवा तो त्या आंबटित घरात राहायला गेल्यापासून यापैकी जे आधी असेल त्या दिवसापासून त्याला हा भत्ता मिळत नाही.

५.	ज्या बाबींमध्ये घरभाडे भत्ता मंजूर होत नाही अशा बाबी-

(१)	खालील कर्मचाऱ्यांना घरभाडे भत्ता दिला जाणार नाही.

(i)	जो पत्तन न्यासाने त्याला आबंटित केलेल्या घरात राहतो.

टीप:	या उपकलमासाठी ज्या कर्मचाऱ्याला वसतीगृह प्रकारचा निवारा आबंटित केला असेल तो कर्मचारी पत्तन न्यासाने आबंटित केलेल्या निवासात राहतो असे समजले जाणार नाही.

(ii)	जो पत्तन न्यासाच्या घरामध्ये अनधिकृतरीत्या राहतो,

(iii)	जो दुसऱ्या कर्मचाऱ्याला बिनभाड्याने आबंटित केलेल्या घरात सहभागी होतो (शेअर करतो)

(२)	खालील बाबतीत कर्मचाऱ्याला घरभाडे मिळत नाही

(i)	जो कर्मचारी त्याला आबंटित केलेल्या घरात राहायला नकार देतो किंवा राहत नाही. परंतु तो आबंटित केलेल्या घरात राहतो असे समजून त्याला त्या काळासाठी मुंबई पत्तन न्यास कर्मचारी (घर आबंटित करणे व त्यात राहणे) नियम १९७५ च्या नियम १० उपकलम (२) नुसार भाडे आकारले जाते.

(ii)	जो आपले आबंटित घर स्वीकारतो पण नंतर परत करतो, पण त्याची योग्य सूचना देत नाही. त्याला त्या काळासाठी मुंबई पत्तन न्यास कर्मचारी (घर आबंटित करणे व त्यात राहणे) नियम १९७५ च्या नियम १९ नुसार भाडे आकारले जाते. त्या काळासाठी त्याला घरभाडे मिळत नाही.

(३)	जो कर्मचारी मुंबई पत्तन न्यासाने आबंटित केलेले घर स्वीकारतो त्याला तो त्या घरात राहायला गेल्याच्या तारखेपासून किंवा त्याने घराचे आबंटन स्वीकारल्या पासून चौदा दिवसाचा काळ संपल्यानंतर यातील जे आधी असेल ते त्या दिवसापासून घरभाडे भत्ता मिळत नाही. मात्र अधिकाऱ्यांनी मुंबई पत्तन न्यास (घर आबंटित करणे व त्यात राहणे) नियम १९७५ च्या नियम १० उपनियम (१) नुसार जर सदर काळातील चौदा दिवसांपेक्षा जास्त वाढवली तर त्या वाढवलेल्या दिवसापासून किंवा तो त्या आबंटित घरात राहायला गेल्यापासून यापैकी जे आधी असेल त्या दिवसापासून त्याला हा भत्ता मिळत नाही.

६. जेव्हा कर्मचाऱ्याला दुसऱ्या कर्मचाऱ्याला आबंटित केलेल्या घरात सहभागी होण्यासाठी (शेअर करण्यासाठी) परवानगी दिली जाते तेव्हा घरभाडे भत्ता मिळण्याबाबत.

जेव्हा एखाद्या कर्मचाऱ्याला मुंबई पत्तन न्यास (घर आबंटित करणे व त्यात राहणे) नियम १९७५ च्या कलम १७ नुसार दुस-या कर्मचाऱ्याला आबंटित केलेल्या घरात रहायला अनुमती दिली जाते (मात्र बिनभाडे तत्वावर नव्हे) तेव्हा त्या कर्मचाऱ्याला (म्हणजे सहभागी होणा-या कर्मचाऱ्याला, दुसऱ्याला घर आबंटित केले त्याला नव्हे) जर अन्यथा घरभाडे भत्ता देय असेल तर घरभाडे भत्ता देय होईल.

७. **घराचे संयुक्त आबंटन केल्यास घरभाडे भत्ता देणे बाबत:** जेव्हा प्रथम व द्वितीय श्रेणीचे कर्मचारी वगळून इतर कर्मचाऱ्यांना मुंबई पत्तन न्यास (घर आबंटित करणे व त्यात राहणे) नियम १९७५ च्या कलम ९ नुसार एका पेक्षा अधिक कर्मचाऱ्यांना एखादे घर संयुक्तरीत्या आबंटित केले जाते तेव्हा त्यांना अन्यथा देय असलेल्या घरभाडे भत्त्याच्या ५०% घरभाडे भत्ता देय होईल.

८. कमी दर्जाच्या घराबद्दल बाजारभावाने भाडे देऊन घरभाडे भत्ता घेण्याच्या पर्याय जर प्रथम व द्वितीय श्रेणीच्या कर्मचाऱ्यांखेरीज इतर श्रेणीचा कर्मचारी पत्तन न्यासाने आबंटित केलेल्या कमी दर्जाच्या घरात राहत असेल व त्याने मंडळाने ठरवून दिलेले भाडे देण्याचा पर्याय निवडला तर त्याला अन्यथा देय असलेला घरभाडे भत्ता दिला जाईल.

९. **स्वत:च्या मालकीचे घर असलेले कर्मचारी**

(१) जर एखादा कर्मचारी तो स्वत:, बायको, मुले, आई, वडील यापैकी कोणाच्याही मालकीच्या घरात राहत असेल तर त्याला त्या घराच्या भाड्याच्या आधारे घरभाडे भत्ता देय आहे (तो जर पूर्ण घरात न राहता घराच्या भागात राहत असेल तर त्या भागापुरता सदर भागाचा नियम ३(ii) कलम एफ नुसार हिशेब केला जाईल) जर वेगळी हिशेब केलेले मूल्य उपलब्ध नसेल तर सदर मूल्य कर्मचाऱ्याच्या ताब्यात असलेल्या घराच्या क्षेत्रफळावर आधारित असेल.

(२) जर कर्मचारी अशा घरात राहत असेल, की जे घर एखादया हिंदू अविभाजित कुटुंबाच्या मालकीचे आहे व सदर कर्मचारी त्या हिंदू अविभाजित कुटुंबाचा सह-समांशभागी आहे तर सदर बाब उपकलम (१) नुसार नियंत्रित केली जाईल. मात्र या बाबतीत तो कर्मचारी सदर हिंदू अविभिजित कुटुंबाच्या व्यवस्थापकाला किती भाडे देतो यावर अवलंबून नसून त्याच्या ताब्यात घराचा किती भाग आहे त्यावर अवलंबून आहे.

१०. <u>**विविध परिस्थितीमध्ये भत्ता देण्याबाबत नियम-**</u>

(अ) रजा- कर्मचारी रजेवर गेल्यास तो रजेवर जाण्यापूर्वी ज्या दराने त्याला घरभाडे भत्ता मिळत होता त्या दराने त्याला घरभाडे भत्ता मिळेल. येथे रजा म्हणजे सर्व तऱ्हेची पूर्ण रजा. मात्र ही रजा १२० दिवसांपेक्षा जास्त असता कामा नये. जर रजेचा कालखंड त्याहीपेक्षा जास्त असेल तर पहिले १२० दिवस. यात सेवानिवृत्ती ची तयारीची/नोकरी कायम संपण्याच्या आधीची रजा, नाकारलेली रजा, किंवा शेवटची रजा किंवा वैद्यकीय प्रमाणपत्राखेरीज अन्य कारणासाठी घेतलेली असामान्य रजा, या सामील नाहीत. जेव्हा सुट्टीला जोडून रजा घेतली जाते तेव्हा तो सुट्टीचा काळ रजेत धरला जाईल.

टीप: जर एखादया कर्मचाऱ्याला त्याची तब्येत बरी नसल्याने पुढे काम करु शकत नाही अशा कारणामुळे रजा मंजूर झाली, तर त्याने त्या रजेबद्दल आधीच घेतलेल्या घरभाडे भत्त्याची वसूली केली जाणार नाही.

(ii) जर एखादा कर्मचारी वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे रजेवर असताना तो क्षयरोग, कर्करोग किंवा इतर रोगामुळे बाधित झाला असेल तर ती रजा सुरुवातीपासून वैद्यकीय कारणास्तव घेतली किंवा इतर रजा चालू असताना तो आजारी पडला या पैकी काहीही असले तरी ही १२० दिवसाची मुदत ८ महिन्यापर्यंत वाढवली जाईल. सदर आठ महिन्यांची मुदत अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष अधिक काळासाठी त्यांच्या मर्जीने वाढवू शकतात. तसेच अर्जाबरोबरील वैद्यकीय प्रमाणपत्रावर मंडळाच्या वैद्यकीय अधिकाऱ्याने स्वाक्षरी किंवा प्रतिस्वाक्षरी केली पाहिजे.

(ब) कर्मचाऱ्याला भारताबाहेर प्रशिक्षणास पाठवल्यास - अशा परिस्थितीमध्ये कर्मचारी भारताच्या बाहेर असल्याच्या पहिल्या सहा महिन्यामध्ये त्याला देय असलेल्या दराने घरभाडे भत्ता मिळेल.

(क) भारतामध्ये प्रशिक्षण-

ज्या कर्मचाऱ्याला भारतात प्रशिक्षणसाठी किंवा सूचनेसाठी पाठविले आहे व सदर काळ तो सेवेत आहे असे समजले जाईल त्याला वेळोवेळी देय असलेल्या दराप्रमाणे घरभाडे भत्ता देय असेल.

(ड) **निलंबन:** ज्या कर्मचाऱ्याला निलंबित केले आहे त्याला निलंबित करणारे अधिकारी त्या कर्मचाऱ्याच्या निलंबित केल्याच्या दिवसाच्या वेतनाच्या दरावर अवलंबून जो दर मान्य करतील त्या दराने तसेच त्या अधिका-यांनी घालून दिलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून घरभाडे भत्ता देय होईल.

(इ) **पुनर्नियुक्ती-** जर एखादया कर्मचाऱ्याला मंडळाच्या सेवेत पुन्हा नियुक्त केले तर त्याला खालील प्रावधानांच्या अधीन राहून घरभाडे भत्ता द्यावा.

(अ) जर त्याला निवृत्तिवेतन (पेन्शन) योजना लागू होत असेल तर घरभाडे भत्ता तो ज्या पदावर पुनर्नियुक्त झाला त्या पदाला जास्तीत जास्त किती वेतन देय आहे त्याच्या आधारे काढला जावा. जर त्याचा पगार अधिक निवृत्ती वेतन हे जास्तीत जास्त वेतनापेक्षा जास्त होत असेल तर या घरभाड्याचा हिशेब जास्तीत जास्त वेतनाच्या आधारे करावा व इतर सर्व बाबतीत तो वेतन अधिक निवृत्तीवेतन या आधारे काढावा.

(ब) सदर कर्मचारी सहभागी भविष्य निर्वाह निधी या योजने अंतर्गत येत असेल तर ज्या पदावर तो कर्मचारी पुनर्नियुक्त झाला आहे त्या पदावर त्याला किती वेतन मिळाले असते, त्यातून त्यांच्या सेवानिवृत्तीच्या फायद्यांमधून पेन्शनची समकक्ष रक्कम वजा न केल्यास येणा-या रकमेच्या आधारे हा घरभाडे भत्ता ठरवला जाईल.

११. **<u>बिनभाड्याच्या घराच्या बाबतीत घरभाडे भत्ता -</u>**

१. जर एखाद्या तृतीय किंवा चतुर्थ श्रेणीच्या कर्मचा-याची त्याच्या सेवेच्या शर्तीनुसार त्याला बिनभाड्याचे घर मिळण्याची पात्रता असेल तर त्याला त्याने दिलेले घरभाडे किंवा त्याच्या पगाराच्या २६% भाडे यातील कमी असेल ती रक्कम, मात्र ही रक्कम घरभाड्याच्या १६% किंवा रुपये २०/- दरमहा यापेक्षा कमी असू नये. सदर कर्मचाऱ्याने दिलेल्या भाड्याच्या पावत्या दर सहा महिन्यानी पडताळणीसाठी सादर कराव्यात.

२. जर एखाद्या कर्मचाऱ्याची बिनभाड्याचे घर पत्तन न्यासा कडून मिळण्याची पात्रता असेल पण त्याने त्या घरात रहायला नकार दिला किंवा तो त्या घरात राहिला नाही, तर तो त्या घरात ज्या दिवसापासून राहिला असता त्या दिवसापासून ते घर रिकामे राहील त्या दिवसापर्यंत त्याला घरभाडे भत्ता मिळणार नाही. त्यानंतर त्या कर्मच्या-याला बिनभाड्याच्या घराकरीता मंजूर झालेल्या सर्वसामान्य दराने भत्ता मिळेल.

टीप- कर्मचा-याला पात्र असलेल्या दर्जाच्या घरापेक्षा खालच्या दर्जाच्या घरात राहायला नकार देणे हे या नियमासाठी नकार देणे समजले जाणार नाही.

१२. श्रेणी १ किंवा २ च्या कर्मचाऱ्यांनी पगाराच्या १६% पेक्षा जास्त दराने घरभाडे भत्त्याच्या (जास्तीत जास्त रु.१६०/- दरमहा) दावा करण्याची पध्दत - श्रेणी १ किंवा २ चे जे कर्मचारी उपरोक्त दावा करु इच्छितात त्याचा असा दावा पहिल्यांदा करताना त्यांनी भाडे दिल्याची मूळ पावती व इतर कागदपत्रे सादर केली पाहिजेत, त्या कागदपत्राची व्यवस्थापक (सेवा व ओ. अँड एम) यांनी पडताळणी केली पाहिजे व तो मंजूर केला पाहिजे. जर भाडे व इतर तपशिलात असा बदल झाला की ज्या योगे घरभाडे भत्त्यात वाढ किंवा घट होईल तर व्यवस्थापन (सेवा व ओ अँड एम) यांची पुन्हा मंजूरी घेणे आवश्यक असेल. असा कर्मचारी दरवर्षी जानेवारी व जुलै महिन्यात सूची १-अ व सूची १-ब यामध्ये दिलेल्या प्रारुपामध्ये प्रमाणपत्र सादर करावे.

१३. ज्या कर्मचाऱ्याची बिनभाडे घर मिळण्याची पात्रता आहे अशा श्रेणी ३ किंवा ४ च्या कर्मचाऱ्यानी पगाराच्या १६% पेक्षा जास्त दराने घरभाडे भत्त्याचा दावा करण्याची पध्दती :

श्रेणी ३ किंवा ४ च्या ज्या कर्मचाऱ्याची बिनभाडे घर मिळण्याची पात्रता आहे अशा कर्मचाऱ्यांनी पगाराच्या १६% पेक्षा जास्त (मात्र रू.२०/- दरमहापेक्षा जास्त नाही) या दराने घरभाडे भत्याचा दावा करू इच्छिणाऱ्या कर्मचाऱ्यांनी असा दावा पहिल्यांदा करताना त्यांनी भाडे दिल्याची मूळ पावती व इतर कागदपत्रे सादर केली पाहिजेत, त्या कागदपत्राची त्या कर्मचाऱ्याच्या विभागप्रमुखांनी पडताळणी केली पाहिजे व तो दावा मंजूर केला पाहिजे. जर भाडे व इतर तपशिलात बदल झाला की ज्या योगे घरभाडे भत्यात वाढ / घट होईल (मात्र ही वाढ जास्तीत जास्त रू.२०/- दरमहा असेल) तर या नव्या दाव्यासाठी विभागप्रमुखांची मंजूरी त्याने घेतली पाहिजे. अशा कर्मचाऱ्यांनी दरवर्षी जुलै व जानेवारी महिन्यात सूची-१ व सूची १-ब यामधील प्रारूपात प्रमाणपत्र सादर करावे.

१४. **प्रमाणपत्र :** ज्या विभागप्रमुखांना पगारपत्र तयार करणे / मंजूर करणे याचे अधिकार दिले आहेत त्यानी दरवर्षी जानेवारी व जुलै महिन्यात सूची ३ यामधील प्रारूपात प्रमाणपत्र सादर करावे.

१५ **स्पष्टीकरण:** जर नियमांच्या स्पष्टीकरणाच्या बाबतीत किंवा येथे नमूद न केलेल्या गोष्टींच्या स्पष्टीकरणाच्या बाबतीत काही प्रश्न उद्‌भवला तर त्याबाबत अध्यक्षांचा निर्णय अंतिम असेल.

१६. **खंडन व व्यावृत्ती:** हे नियम लागू झाल्याची घोषणा होण्यापूर्वी जे नियम लागू होते ते त्वरीत रद्द होत आहेत (खंडित होत आहेत). मात्र त्या नियमांखाली पारित केलेले आदेश किंवा केलेल्या कृती या आदेशाखाली पारित केलेले आदेश आहेत किंवा कृती असे समजण्यात येईल.

नियम १२ नुसार

श्रेणी १ किंवा २ च्या कर्मचाऱ्यांनी पगाराच्या १६% पेक्षा जास्त दराने

घरभाडे भत्त्याचा (जास्तीत जास्त रुपये १६०/- दरमहा) दावा करण्यासाठीचा सादर करण्याचे प्रमाणपत्र.

१. मी असे प्रमाणपत्र सादर करीत आहे की, मी____________________________या ठिकाणी या घरात भाड्याने (घराचा पत्ता) दिनांक __________________पासून दिनांक ____________पर्यंत राहत आहे. तसेच मी दरमहा रु._______भाडे देत आहे. या भाड्यात खालील रकमा समाविष्ट आहेत/नाहीत :

| | | |
|---|---|---|
| अ) | रेफ्रिजरेटरचे भाडे (अन्यथा फर्निचर असल्यास) | रु.१५/- |
| ब) | माझ्या पगाराच्या २ $^{1}/_{2}$% रक्कम फर्निचरचे भाडे म्हणून | रु. |
| भ) | नगरपालिकेचे व इतर कराचा राहणाऱ्याने भरण्याचा, पण कायद्यानुसार भाडे चलन भरणे सक्तीचे नसल्याचा | रु. |
| ड) | सेवा कर (वेगळा लावलेला व तसा भरलेला) | रु. |

काळ_________________________________________या कालखंडासाठी

२. मी असे प्रमाणपत्र सादर करतो की ज्या घराचा घरभाडे भत्त्याचा मी दावा करीत आहे ते पोटभाड्याने दिलेले नाही वा सर्वसाधारणपणे माझ्या कुटुंबातील नसलेल्या व्यक्ती त्या घरात राहत नाहीत.

दिनांक

स्वाक्षरी
कर्मचाऱ्याचे नाव
पदनाम
विभाग

लागू नसल्यास खोडा.

नियम १२ नियम ९ नुसार

श्रेणी १ किंवा २ च्या कर्मचाऱ्यांनी पगाराच्या १६% पेक्षा जास्त दराने घरभाडे भत्याचा (जास्तीत जास्त रुपये.१६०/- दरमहा) दावा सादर करण्यासाठी सादर करण्याचे प्रमाणपत्र.

१) मी असे प्रमाणपत्र सादर करीत आहे की, मी अशा घरात राहत आहे की जे माझ्या / माझ्या पत्नीच्या / मुलाच्या / मुलीच्या / आईच्या / वडीलाच्या / हिंदू अविभक्त कुटुंबाचा मालक आहे व मी त्या कुटुंबाचा ______ ______आहे. उपरोक्त घराचा पत्ता ________________________असा आहे.

मी येथे ____________पासून ______________पर्यंत राहत आहे, तसेच सदर घराचे नगरपरिषदेच्या कारणांसाठी हिशेब केलेले भाडे (दुरुस्तीसाठीची १०% सवलत वजा न करता) रुपये __________आहे. त्यामध्ये खालील रकमा समाविष्ट आहेत / नाहीत:

| | | |
|---|---|---|
| अ) | मालकाने देण्याचे नगरपालिकेचे व इतर कर | रु. |
| ब) | वेगळा लावलेला सेवा कर | रु. |

____________या कालखंडासाठी

२) मी असे प्रमाणपत्र देतो की, ज्या घराबाबत भत्त्याचा दावा केला आहे त्या घरात माझ्या कुटुंबात न राहणाऱ्या व्यक्ती राहत नाहीत.

दिनांक

स्वाक्षरी
कर्मचाऱ्याचे नाव
पदनाम
विभाग

*लागू नसल्यास खोडा.

नियम १३ नुसार
जे तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचारी बिनभाड्याच्या घराऐवजी
घरभाडे भत्त्याला पात्र असतात, त्यांनी पगाराच्या १६% पेक्षा जास्त
दराने घरभाडे भत्ता प्राप्त करण्यासाठी सादर करण्याचे प्रमाणपत्र.

१) मी असे प्रमाणपत्र सादर करतो की, मी खालील दिलेल्या पत्त्यावरील घरात ___________

पासून _____________पर्यंत (कालखंड) भाड्याने राहत आहे_____________________________

__________________________________________(पत्ता) तसेच मी दरमहा रुपये ___

भाडे देत आहे. त्यामध्ये खालील रक्कम समाविष्ट होते / होत नाही :

| | | |
|---|---|---|
| अ) | नगरपालिकेचे व इतर कर (मालकाने भरण्याचे) | रु. |
| ब) | वेगळा लावलेला सेवा कर | रु. |

कालखंड____________

तारीख:

स्वाक्षरी
कर्मचाऱ्याचे नाव
पदनाम
विभाग

नियम १४ नुसार सूची-३
विभागाध्यक्ष किंवा पगारपत्रक तयार करणाऱ्या / मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांनी
दरवर्षी जानेवारी व जुलै महिन्यात देण्याचे प्रमाणपत्र.

(i) असे प्रमाणित करण्यात येते की, ज्या कर्मचाऱ्यांना या पगारपत्रकात घरभाडे भत्ता दिलेला आहे, त्यांची घरभाडे भत्ता मिळण्याचा पात्रतेत मुंबई पत्तन न्यास कर्मचारी (घरभाडे भत्ता) नियम, १९७५

(ii) असे प्रमाणित करण्यात येते की, ज्या कर्मचाऱ्यांना पगाराच्या १६% पेक्षा जास्त घरभाडे भत्ता (जास्तीत जास्त रु.१६०/- दरमहा किंवा जास्तीत जास्त रू.२०/- दरमहा, जसे असेल तसे) दिला आहे, त्यांच्याकडून मुंबई पत्तन न्यास (घर भाडे भत्ता) नियम, १९७५ द्वारा विहित केलेली प्रमाणपत्रे प्राप्त केली आहेत. सदर प्रमाणपत्रे सदर नियमानुसार आहेत याबाबत माझी खात्री आहे.

138.157/reg. Marathi/HRA Allowance(Marathi)